होळी...

फाल्गुनात या ऊन वाढते, थंडी संपुन गेली
पूर्ण चंद्रमा घेऊनि येते, हुताशनी ही होळी --।।धृ।।

नका हो तोडू झाडे ओली, पेटविण्याला अग्नी
निरुपयोगी ती शुष्क लाकडे, आणूया वेचुनी
शास्त्र म्हणुनि एकच वाहू, पुरणाची छोटी पोळी ...

अल्पजीवी ती पेटवू होळी, असो रूपही छोटे
एकच होळी करुनी सारे, टाळू प्रदूषण मोठे
अति तापता भूमी येईल, पस्ताव्याची पाळी ...

करु होळीला वंदन सारे, वाहुनिया सुमने
परस्परातील द्वेष जाळुनी, जोडू आपली मने
प्रेमभाव वाढुनी जळावी, कुविचारांची टोळी ..

बोंबा मारुनि शिव्या ना देऊ, सदैव संयम पाळू
मद्य-मांस ते मुळी ना सेवू, सद्वर्तन सांभाळू
देशोन्नतीला साधू देऊन, सहकार्याची टाळी ..



रचना- मोहन बेदरकर
चिंचवड. पुणे- ३३